महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६००४.

क्र.कोविमं/१२वी-परीक्षा/खाजगी/ 1360
दिनांक : २७/०८/२०१८

प्रति,
सर्व प्राचार्य,
मंडळ मान्यताप्राप्त क.महाविद्यालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय : - फेब्रुवारी - मार्च २०१९ च्या परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन (ONLINE) नावनोंदणी अर्जास मुदतवाढ देण्याबाबत...**

**संदर्भ :- या कार्यालयाचे क्र.कोविमं./१२ वी परीक्षा /खाजगी /११२० दि.२७/०७/२०१८ रोजीचे पत्र...**

उपरोक्त विषयाच्या संदर्भाकिंत पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की , माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याचा कालावधी दिनांक ३०/०७/२०१८ पासून ते दिनांक २५/०८/२०१८ पर्यंत निश्चित करण्यात आला होता. तथापी , नाव नोंदणी अर्जास मुदतवाढ देण्यात येत असून त्याचा वाढीव कालावधी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्रं. | नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्यासाठी वाढीव तारखा | तपशिल |
|---|---|---|
| १. | रविवार दिनांक २६/०८/२०१८ ते सोमवार दिनांक १०/०९/२०१८ | विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन भरणे. |
| २. | सोमवार दिनांक २७/०८/२०१८ ते मंगळवार दिनांक ११/०९/२०१८ | विद्यार्थ्यांचा मूळ अर्ज, विहित शुल्क व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या संपर्क केंद्र शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जमा करणे. |
| ३. | शनिवार दिनांक १५/०९/२०१८ | संपर्क केंद्र शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज, विहित शुल्क, मूळ कागदपत्रे व यादी विभागीय मंडळाकडे जमा करणे. |

फेब्रु/मार्च-२०१९ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेसासठी नाव नोंदणी अर्जाबाबत (फॉर्म नं.१७) ऑन लाईन प्रक्रियेद्वारे वाढीव दिनांक **२६/०८/२०१८ ते दिनांक १०/०९/२०१८** पर्यंत आहे. ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट, मुळ कागदपत्रे, व विहित शुल्क याप्रमाणे दिनांक **२७/०८/२०१८ ते ११/०९/२०१८** या कालावधीत कनिष्ठ महाविद्यालयानी जमा करुन घ्यावे.व आवश्यक कागदपत्रासह प्राप्त झालेले सर्व अर्ज व चलनासह यादी दिनांक **१५/०९/२०१८** पर्यंत कार्यालयात जमा करावयाचे आहेत.

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

Acer/msword/letter

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

## * प्रकटन *

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं.१७ भरून परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

फेब्रुवारी-मार्च २०१९ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) ऑनलाईन प्रक्रियेव्दारे भरण्याबाबत मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यासाठी खाली नमूद केलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावी.

१. इ.१०वी व इ.१२वी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या मुदतवाढीबाबतच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्यासाठी तारखा | तपशील |
|---|---|---|
| १ | रविवार दिनांक २६/०८/२०१८ ते सोमवार दिनांक १०/०९/२०१८ | विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन भरणे. |
| २ | सोमवार दिनांक २७/०८/२०१८ ते मंगळवार दिनांक ११/०९/२०१८ | विद्यार्थ्यांनी मूळ अर्ज, विहित शुल्क व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या संपर्क केंद्र शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जमा करणे. |
| ३ | शनिवार दिनांक १५/०९/२०१८ | संपर्क केंद्र शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज, विहित शुल्क, मूळ कागदपत्रे व यादी विभागीय मंडळाकडे जमा करणे. |

२. खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१० वी व इ.१२ वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

**संकेतस्थळ-** इ.१० वी - **http://form17.mh-ssc.ac.in**

इ.१२ वी - **http://form17.mh-hsc.ac.in**

४. विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरीता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास व्दितीयप्रत व प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) स्वतःचा पासपोर्ट आकारातील फोटो स्वतःजवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरताना सदर कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावयाची आहेत.

५. कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलव्दारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत. **विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य (compulsory) आहे.**

६. संपूर्ण अर्ज भरून झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेल वर पाठविली जाणार आहे. तसेच या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट, शुल्क पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत काढून घ्यावी.

७. विद्यार्थ्यांनी अर्ज, विहित शुल्क व मूळ कागदपत्रे नावनोंदणी अर्जावर नमूद केलेल्या संपर्क शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विहित मुदतीत जमा करावयाची आहेत.

८. खाजगी विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे-

**इ.१०वी - रू.१०००/- नोंदणी शुल्क + रू. १००/- प्रक्रिया शुल्क (Processing fee)**

**इ.१२वी- रू. ५००/- नोंदणी शुल्क + रू. १००/- प्रक्रिया शुल्क (Processing fee)**

९. अ) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन होणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यास त्याच्या पत्त्यानुसार व त्याने निवडलेल्या माध्यम निहाय संपर्क केंद्राची यादी दिसेल त्यापैकी एका संपर्क केंद्राची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या संपर्क केंद्राने प्रकल्प, प्रात्यक्षिक परीक्षा, तोंडी परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी विषयासंदर्भातील कामकाज करावयाचे आहे.

ब) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांनी नावनोंदणी ऑनलाईन करावयाची आहे. नावनोंदणी करताना विद्यार्थ्याचा पत्ता, त्याने निवडलेली शाखा व माध्यम निहाय त्यास कनिष्ठ महाविद्यालयाची यादी दिसेल त्यामधील एका कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या कनिष्ठ महाविद्यालयाव्दारे परीक्षा अर्ज, प्रकल्प, प्रात्यक्षिक/तोंडी श्रेणी परीक्षा दयावयाच्या आहेत. याबाबत सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना विभागीय मंडळांनी मार्गदर्शन करावे.

१०. विहित शुल्क रोखीने संपर्क शाळा/क.महाविद्यालयात जमा करावयाचे आहे. विद्यार्थ्यांनी संपर्क शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांकडून अर्जासोबत दिलेल्या पावत्यांपैकी विद्यार्थ्यांसाठीच्या प्रतीवर स्वाक्षरी व शिक्का घेवून ती स्वतःकडे ठेवावी.

११. दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ठ व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या/प्राधिकृत केलेल्या हॉस्पिटलच्या प्रमाणपत्राची छायाप्रत प्रमाणित करून अर्जासोबत सादर करावी व आवश्यकतेनुसार विभागीय मंडळ/कनिष्ठ महाविद्यालय/संपर्क केंद्र यांचेकडून माहिती प्राप्त करून घ्यावी.

१२. खाजगी विद्यार्थ्यांसाठी असलेली माहिती पुस्तिका संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. ऑनलाईन अर्ज भरताना कोणतीही अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्र.०२०-२५७०५२०८/२५६७६४०५/२५७०५२७१ वर संपर्क साधावा.

१३. विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र ऑनलाईन देण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी. तसेच विद्यार्थ्यांनी अर्जासोबत छाननीसाठी दिलेली मूळ कागदपत्रे संपर्क केंद्र/कनिष्ठ महाविद्यालयांकडून आवेदनपत्रे भरून झाल्यावर परत घेवून जाण्याची दक्षता घ्यावी.

१४. पात्र विद्यार्थ्यांना नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे (examination form) मंडळाने विहित केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक आहे याची नोंद विद्यार्थ्यांनी घ्यावी.

(श्री.टि.एल.मोळे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

Acer/msword/letter